RNI No. MAHBIL/2009/31743

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार-ब

वर्ष १२, अंक ५] गुरुवार ते बुधवार, जून १८-२४, २०२६/ज्येष्ठ २८-आषाढ ३, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २०.००

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ मे २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र प्राचीनस्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०.

क्रमांक रासंस्मा-२०२३/प्र.क्र. ३११/सां.का. ३.—ज्याअर्थी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची प्राथमिक अधिसूचना क्रमांक रासंस्मा. २०२३/प्र.क्र. ३११/सां.का. ३, दिनांक ३ सप्टेंबर २०२४ या अन्वये महाराष्ट्र शासनाने या सोबत असलेल्या अनुसूचित निर्दिष्ट केलेले प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा इरादा असल्याची महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये दोन महिन्यांची मुदत दिली होती ;

आणि ज्याअर्थी, असे स्मारक संरक्षित म्हणून घोषित करण्यासंबंधी शासनाकडे कोणत्याही हरकती आलेल्या नाहीत.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक असल्याचे जाहीर करत आहे.

अनुसूची

स्थान मौजे कलिवडे, **तालुका** चंदगड, **जिल्हा** कोल्हापूर

गट क्रमांक १५४ , हि.क्र. अ १ आणि हि.क्र. अ २

स्मारकाचे नांव	:	कलानंदीगड किल्ला
मालकी	:	(१) १५४ हि.क्र. अ १—महाराष्ट्र शासन (वने) (२) १५४ हि.क्र. अ २—महाप्रबंधक भारत संचार निगम लिमिटेड, कोल्हापूर विभाग
तपशील	:	सभासद बखरमधील नोंदीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी हरेकर सावंत भोसले व तांबुळवाडीकर सावंत यांनी स्थिरस्थावर करण्याच्या दृष्टिकोनातून कलानंदीगड या किल्ल्याची निर्मिती केली.

संरक्षित करावयाच्या स्मारकाचे क्षेत्रफळ (स्मारकासह)	:	(१) १५४ हि.क्र. अ १—३०३.८८.७ हेक्टर आर. (२) १५४ हि.क्र. अ २—००.२४.३ हेक्टर आर.
संरक्षित करावयाचे एकूण क्षेत्रफळ	:	क्षेत्रफळ : ३०४.१३ हेक्टर आर.
संरक्षित करावयाच्या क्षेत्राच्या चतुःसीमा	:	पूर्व—सर्व्हे क्रमांक १३३ ; पश्चिम—शेवाळे गावचे जंगल ; उत्तर—गावठाण, सर्व्हे क्रमांक १६१, १६२, १५०, १४९ ; दक्षिण—किटवडे गावचे जंगल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नंदा राऊत,
शासनाचे उप सचिव.

TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,
dated 22nd May 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA ANCIENT MONUMENTS AND ARCHAEOLOGICAL SITES AND REMAINS ACT, 1960.

No. Rasansma-2023/CR.-311/Sanka-3.—Whereas, by the Government Notification No. Rasansma-2024/C.R. 311/Sanka-3, dated 3rd September 2024 ; the Government of Maharashtra had given two months' notice from the date of publication of the said notification to declare the ancient and historical monument specified in the Schedule appended hereto to be a Protected Monument, as required by sub-section *(1)* of section 4 of the Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. XII of 1961) ;

And Whereas, the Government has not received any objection to the making of such a declaration.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(3)* of section 4 Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. Act No. XII of 1961) ; the Government of Maharashtra hereby declares the said ancient and historical monument to be a Protected Monument.

Schedule

Locality : Mouje Kalivade, Taluka : Chandgad, District : Kolhapur

Gat Number : 154, Part No. A1 and A 2

Name of the Monument to be Protected	:	Kalanandigad Fort
Ownership	:	(1) S. No. 154, Part No. A1 : Government of Maharashtra (Forest) (2) S. No. 154, Part No. A2 : General Manager, Bharat Sanchar Nigam Ltd., Kolhapur.
Particulars	:	As mentioned in Sabhasad Bakhar, Kalanandigad was built by Chhatrapati Shivaji Maharaj created for settling of Herekar Sawant, Bhosale and Tambulwadikar Sawant.
Area of the Monument to be protected	:	(1) S. No. 154, Part No. A1 : 303.88.07 Ha/Aar (2) S. No. 154, Part No. A2 : 00.24.03 Ha/Aar
Total Area (including monument) to be protected	:	Total—304.13.00 Ha/Aar
Boundaries	:	*East*—Survey No. 133 of Kalivade Village ; *West*—Forest of Shevale Village ; *North* —Old Gaonthan Survey Number. 161, 162, 150, 149 ; *South*—Forest of Kitavade.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NANDA RAUT,
Deputy Secretary to Government.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य, विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ मे २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६०.

क्रमांक रासंस्मा-२०२५/प्र.क्र. १८/सां.का. ३.—ज्याअर्थी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची प्राथमिक अधिसूचना क्रमांक रासंस्मा. २०२५/प्र.क्र. १८/सां.का. ३, दिनांक १५ एप्रिल २०२५ याअन्वये महाराष्ट्र शासनाने यासोबत असलेल्या अनुसूचित निर्दिष्ट केलेले प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा इरादा असल्याची महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये दोन महिन्यांची मुदत दिली होती ;

आणि ज्याअर्थी, असे स्मारक संरक्षित म्हणून घोषित करण्यासंबंधी शासनाकडे कोणत्याही हरकती आलेल्या नाहीत.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) या अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक असल्याचे जाहीर करत आहे.

अनुसूची

स्थान चंद्रपूर, तालुका चंद्रपूर, जिल्हा चंद्रपूर

गट क्रमांक १६६३

स्मारकाचे नांव	:	सराय (धर्मशाळा)
मालकी	:	महानगरपालिका, चंद्रपूर
तपशिल	:	चंद्रपूर शहरात येणाऱ्या महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या निवासाकरिता इ. स. १९२१ मध्ये या सरायची निर्मिती सुरू झाली होती. चंद्रपूरचा ऐतिहासिक वारसा कथन करणारी तथा सांस्कृतिक व राजकीय घडामोडींचे दर्शन घडविणारे ही महत्त्वपूर्ण वास्तु आहे. समलंब चौकोनी आकाराच्या या वास्तूचे निर्माण दगड, विटा व लाकडापासून झालेले आहे. या द्विमजली इमारतीच्या तळमजल्यावर चार खोल्या असून इमारतीच्या मधोमध मुख्य प्रवेशद्वार व समोर वरांडा आहे. वरील मजल्यावर ही याच प्रकारची स्थापत्यरचना आहे. हे स्मारक भारतीय व ब्रिटीश वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे.
संरक्षित करावयाच्या स्मारकाचे क्षेत्रफळ	:	सराय (धर्मशाळा) : लांबी १९.०० मीटर X रूंदी ११.७० मीटर एकूण क्षेत्रफळ : २२२.३० चौरस मीटर.
संरक्षित करावयाचे एकूण क्षेत्रफळ (स्मारकासह)	:	लांबी ३४.०० मीटर X रूंदी २०.०० मीटर एकूण क्षेत्रफळ : ६८० चौरस मीटर (स्मारकासह)
संरक्षित करावयाच्या क्षेत्राच्या चतुःसीमा	:	पूर्व—खुली जागा ; पश्चिम—रोड ; उत्तर—दुकान व चाळ ; दक्षिण—खुली जागा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नंदा राऊत,
शासनाचे उप सचिव.

TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Mumbai 400 032,
dated 22nd May 2026.

NOTIFICATION

Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960.

No. Rasansma-2025/CR.-18/Sanka-3.—Whereas, by the Government Notification No. Rasansma-2025/C.R. 18/Sanka-3, dated 15th April 2025 ; the Government of Maharashtra had given two months' notice from the date of publication of the said notification to declare the ancient and historical monument specified in the Schedule appended hereto to be a Protected Monument, as required by Sub-Ssection *(1)* of Section 4 of the Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. Act No. XII of 1961) ;

And Whereas the Government has not received any objection to the making of such a declaration ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub-Section (*3*) of Section 4 Maharashtra Ancient Monuments and Archaeological Sites and Remains Act, 1960 (Mah. Act No. XII of 1961) ; the Government of Maharashtra hereby declares the said ancient and historical monument to be a Protected Monument.

Schedule

Locality : Chandrapur, Taluka : Chandrapur, Disrict : Chandrapur

Gat Number : 1663

Name of the Monument to be Protected	:	Sarai (Rest House)
Ownership	:	Municipal Corporation, Chandrapur.
Particulars	:	The constuction of this Sarai was initiated in 1921 C.E. to accommodate important visitors to Chandrapur. This mounment narrates the hisorical heritage of Chandrapur and displays its cultural and political significance. This trapezoidal structure is made of stone, brick and wood. There are four rooms on the ground floor of this two-storey building and a main entrance in the middle of the building with a *Verandah* in the front. The upper floor also follows the same architectural layout. This mounment is an excellent specimen of both Indian and British architectural styles.
Total Area of the Monument to be protected	:	Sarai (Rest House) : Length 19.00 Meters x Width 11.70 Meters Total Area : 222.30 Square Meters.
Total protected Area (including the Monument)	:	Length : 34.00 Meters x Width 20.00 Meters Total Area : 680 Square Meters (Including the Monument).
The Boundaries of the Area to be Protected	:	East—Open Space ; West—Road ; North —Shops and a Residential Block ; South—Open Space.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NANDA RAUT,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD,